**प्रारूप नमूना क**
**ई-निविदा सूचना क्र.१ (प्रथम वेळ)**

आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,गोंदिया अंतर्गत जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र,जि.गोंदिया येथे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये निर्माण करण्यात आलेली कुशल व अकुशल कंत्राटी पदे बाहय यंत्रणेमार्फत भरण्याकरिता कंत्राटदाराकडून (Open Tender)ई-निविदा मागविण्यात येत आहेत.सदर ई-निविदा बाबतची संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.सदर ई- निविदा दिनांक १९.०६.२०२५ पासून ते दिनांक ३०.०६.२०२५ रोजी (दुपारी ५ वाजेपर्यंत भरता येईल)

| | |
|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद,गोंदिया<br>*Signed on E-Office* | स्वा/- |

Scanned with OKEN Scanner

### प्रारूप नमूना क-१

कार्यालय आरोग्य विभाब जि.प.गोंदिया
पत्ता - प्रशासकीय इमारत,पतंगा मैदान आमगाव रोड फुलचूर जिल्हा परिषद,गोंदिया
दूरध्वनी क्रमांक ०७१८२-२३११३६
ई-निविदा जाहिरात क्र. ०१/२०२५

जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत रिक्त पदे असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कामे करण्याकरिता प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक उपलब्ध करून दयावयाचे आहेत.त्यासाठी मनुष्यबळ पुरवठा केल्याचा अनुभव असणाऱ्या बाहय यंत्रणेकडून ई-निविदा व्दारे Expression Of Interests मागविण्यात येत आहेत.

सदर ई-निविदा सूचना परिशिष्टे इत्यादी www.mahatenders.gov.in आणि zpgondia.gov.in(जि.प.चे संकेतस्थळ)या संकेतस्थळावर दिनांक १९.०६.२०२५ ते दिनांक ३०.०६.२०२५ रोजी ०५.३० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.

कामाचे नाव :- जिल्हा परिषद,गोंदिया अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रे येथे प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,वाहन चालक व स्वच्छक पदे उपलब्ध करणेबाबत.

| | |
|---|---|
| कामाचा अंदाजित वार्षिक खर्च | रूपये ४१५१२८०/- |
| निविदा शुल्क | रूपये ५००/- |
| ईसारा रक्कम/बयाणा रक्कम | रूपये ५०,०००/- |
| सुरक्षा रक्कम | मंजूर करण्यात येणाऱ्या संस्थेची इसारा रक्कम अनामत रकमेत रुपांतरीत करण्यात येईल. |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक १९.०६.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता |
| निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक १९.०६.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून<br>दिनांक ३०.०६.२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| संपर्क अधिकारी | डॉ. अभिजीत गोल्हार जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद,गोंदिया<br>दूरध्वनी क्र.०७१८१-२३११३६<br>ई मेल dhozp-gondia@rediffmail.com |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३०.०६.२०२५ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक ०२.०७.२०२५ वेळ दुपारी १२.०० वाजता |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | जिल्हा परिषद,गोंदिया |

प्राप्त ई-निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारणेचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात येतील.सदरची निविदा कोणत्याही किमान कामाचा हक्कत प्रस्थापित करत नाही.

बाहय यंत्रणेकडून पुरविण्यात येणाऱ्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक व या मनुष्यबळाची पात्रता.

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र | संवर्गाचे नाव | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | वयोमर्यादा | मानधन | आवश्यक पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १.मान्यता प्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र व जीवशास्त्र घेऊन विज्ञान विषयाची पदवी<br>२.DAMLT उत्तीर्ण<br>३.संगणक अर्हता MSCIT उत्तीर्ण | १८ ते ५५ वर्ष | २५०००/- | ५ |
| २ | औषध निर्माण अधिकारी | १.औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदविका धारण करणारे आणि औषध शास्त्र अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते परिक्षा उत्तीर्ण<br>२.B.Pharm//D.Pharm परिक्षा उत्तीर्ण<br>३.संगणक अर्हता MSCIT उत्तीर्ण | १८ ते ५५ वर्ष | १६६००/- | ४ |
| ३ | आरोग्य सहाय्यक | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केलेली असेल आणि ज्यांनी बहुउददेशीय कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठयक्रम अथवा स्वच्छता निरीक्षकाचा पाठयक्रम वा तुल्य पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला असेल. | १८ ते ५५ वर्ष | १५८००/- | ३ |
| ४ | वाहन चालक | १.माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण<br>२.वाहन चालविण्याचा अधिकृत/शासनमान्य परवाना | १८ ते ५५ वर्ष | १४९००/- | ३ |

**बाहय यंत्रणेस देय मानधन**

बाहय यंत्रणेने वरील पात्रतेप्रमाणे प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक हे मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावयाचे आहे. बाहय यंत्रणा संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाला कायद्याप्रमाणे किमान वेतन देणे बंधनकारक राहील तसेच शासनाने ठरविलेले प्रमाणे EPF,ESIC इत्यादी कपात करुन भरणा करणे बंधनकारक राहील.कामगार आयुक्त कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले वाढीव दैनिक भत्ता कामगारांना अदा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

बाहय यंत्रणेने सर्व पदाचे दर निविदेमध्ये भरतांना किमान वेतन कायद्याचे उल्लंघन करु नये.जर बाहय यंत्रणेने एकही पदाचा दर किमान वेतन दरापेक्षा कमी सादर केला तर त्यांना अपात्र करण्यात येईल.

<u>व्यवस्थेचा कालावधी</u>

बाहय यंत्रणेकडून उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळाच्या सेवा या ३ वर्षाच्या कालावधीकरिता उपलब्ध करुन घेणेसाठी सक्षम बाहय यंत्रणेकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

ई-निविदेव्दारे बाहययंत्रणेच्या माध्मातुन मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी जाहिरात देणे,बाहययंत्रणेची अंतिम निवड करणे,योग्य पात्रतेचे उमेदवार बाहययंत्रणेकडून उपलब्ध करुन घेणे,बाहययंत्रणाकडून प्राप्त मनुष्यबळ योग्य पात्रतेचे नसल्यास नाकारणे,पुरवठा केलेल्या मनुष्यबळाचे काम समाधानकारक नसल्यास पुरविलेले मनुष्यबळ बाहययंत्रणेकडे परत पाठविणे,पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे,बाहययंत्रणेच्या सेवा समाधानकारक नसल्यास बाहययंत्रणेच्या सेवा संपुष्टात आणणे,बाहययंत्रणेविरुध्द व बाहययंत्रणेने पुरविलेल्या मनुष्यबळाविरुध्द आवश्यक ती कायदेशीर/फौजदारी कार्यवाही करणे,इत्यादीबाबतचे सर्व अधिकार खाली स्वाक्षरी करणाऱ्यांना आहेत.

| | |
|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>*Signed on E-Office* | स्वा/- |

| | |
|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>*Signed on E-Office* | स्वा/- |

Scanned with OKEN Scanner

## प्रारुप नमूना -क्र.२

## संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या निविदेच्या अटी व शर्ती

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,गोंदिया यांचेकडून आरोग्य विभागांतर्गत तालुका वैद्यकीय अधिकारी गोंदिया जिल्हा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रात रिक्त असलेल्या ठिकाणी बाहययंत्रणा संस्थेकडून प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक उपलब्ध करावयाचे आहेत यासाठी कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या बाहययंत्रणेकडून निविदा प्रणालीव्दारे एक लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.सदर कामाचा अंदाजित वार्षिक खर्च रु.४१५१२८०/- इतका आहे.या कामासाठी खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

निविदा फॉर्म रु.५००/- व ईसारा रक्कम रु.५०,०००/- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,गोंदिया यांच्या नावाने स्टेट बँक ऑफ इंडीया,गोंदिया येथील खाते क्र..३४०२७५७४७४५ मध्ये नेट बँकीगव्दारे भरणा करावा.(या रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.ईसारा रक्कम भरलेली नसल्यास निविदेचा विचार करता येणार नाही तसेच ईसारा रक्कम भरण्यातून सूट असल्यास तसे दर्शविणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे)

निविदा स्विकृतीचा कालावधी दिनांक १९.०६.२०२५ ते दिनांक ३०.०६.२०२५ असून प्राप्त ई निविदा दिनांक ०२.०७.२०२५ रोजी सकाळी /दुपारी १२.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,गोंदिया यांचे समक्ष उघडण्यात येतील.

१. सदर ई-निविदा www.mahatender.gov.in व www.zpgondia.gov.in जिल्हा परिषद,गोंदिया चे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. निविदेत खालील कागदपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

a) Pancard ची साक्षांकीत प्रत.
b) आर्थिक वर्ष २०२२-२३आर्थिक वर्ष.२०२३-२४वआर्थिक वर्ष२०२४-२५चे आयकर विवरणपत्र (Return)
c) आर्थिक वर्ष२०२२-२३ आर्थिक वर्ष.२०२३-२४ वआर्थिक वर्ष २०२४-२५चे सेवा कर भरल्याचे प्रमाणपत्र.
d) कर्मचारी भविष्य निधी संघटन कार्यालय(EPFO) यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र.
e) ESIC कार्यालय यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र.
f) कामगार कल्याण निधी कार्यालय यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र.
g) व्यवसाय कर कार्यालय यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र.
h) GST नोंदणी प्रमाणपत्र.
i) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र (नुतनीकरणासह)
j) शासकीय/निमशासकीय /केंद्र शासकीय कार्यालयांना वाहन चालक/सफाई कामगार इत्यादी मनुष्यबळ पुरवठा केल्याचा किमान २ वर्षाचा तपशील व प्रमाणपत्र तसेच केलेल्या कामाचा कार्यारंभ आदेश व काम समाधानकारकरित्या केल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
k) शासकीय/निमशासकीय/केंद्रशासकीय कार्यालयामध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र निविदाधारकाने देणे आवश्यक राहील.
l) संस्था स्थानिक असावी,त्यासंबंधी संस्थेच्या कार्यालयाचा संपूर्ण पत्ता.
m) कंपनी कायदा १९५६ अंतर्गत /Partenership act अंतर्गत/Proprietary Act अंतर्गत/Co operation Act अंतर्गत/Bombay Public Trust अंतर्गत यापैकी कोणत्याही कायदयान्वये नोंदणी झाल्याचे प्रमाणपत्र .
n) निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व नोंदणी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती स्वयं साक्षांकीत केलेल्या असल्या पाहिजे.
o) ईसारा रक्कम व निविदा फी online banking व्दारे भरल्याचे UTR बँकेच्या क्रमांकाची प्रत जोडावी.
p) उपलब्ध साधनसामग्री व मनुष्यबळ बाबत माहिती जोडावी.

Scanned with OKEN Scanner

q) निविदा भरावयाच्या दिनांकास संस्थेकडे शिल्लक रकमेचे Bank Balance Certificate जोडावी.

r) मागील ३ वर्षातील उलाढाल (Audit Report) (सन ..........................)

३. अट क्र.४ मध्ये नमूद a ते r प्रमाणपत्राची पूर्तता करणाऱ्या संस्थेला गुणानुक्रमे पात्र ठरविण्यात येईल.

४. ज्या बाहययंत्रणा संस्थेला काम मंजूर करण्यात येईल तिला कामाचा आदेश देण्यापूर्वी त्यांचेकडून रक्कम रु.५००/- च्या बाँड पेपरवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेल्या अटी व शर्तीसह बंधपत्र नोटरी करुन लिहून घेण्यात येईल तसेच ईसारा रक्कम,सुरक्षा रक्कम म्हणून कार्यालयाकडे करारानुसार जमा ठेवण्यात येईल.

५. निविदेत सहभागी निविदाधारकाने निविदा प्रक्रीयेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेमधून माघार घेतल्यास त्याची ईसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

६. निविदा मंजूर करणे अगर नाकारणे आणि आवश्यक वाटल्यास विभागून देणे हे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

७. निविदेतील कोणताही भाग अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचा हक्क मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

८. मनुष्यबळ पुरवठा करणारी बाहययंत्रणा ही कंपनी कायदा १९५६ अंतर्गत १९५६ अंतर्गत /Partenership act अंतर्गत/Proprietary Act अंतर्गत/Co operation Act अंतर्गत/Bombay Public Trust अंतर्गत यापैकी कोणत्याही कायदयान्वये नोंदणी झालेली व संबंधित बाहययंत्रणेच्या कायदयाच्या मुख्य उददीष्टामध्ये मनुष्यबळ पुरवठा करण्याची तरतूद असणे अनिवार्य आहे.अशाच नोंदणीकृत मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाहययंत्रणेकडून निविदा स्विकारण्यात येईल.

९. संबंधित मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या नोंदणीकृत बाहययंत्रणेने सर्व लागू असणारे कामगार कायदे व संबंधित कायदे यांची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१०. निवड झालेल्या बाहययंत्रणेस देय असलेले मानधन अदा करण्यात येईल.व बाहययंत्रणेमार्फत सदर मानधन संबंधित मनुष्यबळास नियमित व वेळीच अदा करावे लागेल.बाहय यंत्रणेस मानधन अदा करण्यापूर्वी मानधनातून नियमानुसार लागू असलेला आयकर(TDS)व GST कायदयानुसार TDS ची कपात करुन मानधन अदा करण्यात येईल.

११. संबंधित मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या नोंदणीकृत बाहययंत्रणेने पुरविलेले प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सहाय्यक व वाहन चालक यांचे शासन निर्णयानुसार अनुक्रमे रक्कम रु................ प्रतीमाह देय मानधन त्यांना NEFT/RTGS व्दारे संबंधिताच्या बँक खात्यात जमा करणे बाहय यंत्रणेस बंधनकारक राहील.

१२. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाहययंत्रणेने प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक मनुष्यबळ जिल्हयासाठी उपलब्ध करुन दयावयाचे आहेत.भविष्यात या पदांच्या संख्येमध्ये वाढ अथवा घट झाल्यास त्यानुसार आवश्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक पुरविण्याची /घटविण्याची किंवा इतरही पदासाठी आवश्यकता भासल्यास त्या पदाच्या शैक्षणिक व इतर पात्रतेनुसार मनुष्यबळ पुरवठा करण्याची जबाबदारी मंजूर झालेल्या निविदाधारकाची राहील.कोणत्याही कारणास्तव सदर पुरवठा करण्याची जबाबदारी नाकरता येणार नाही.

१३. मनुष्यबळ पुरवठा करतांना बाहययंत्रणेने जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक नाव,भ्रमणध्वनी क्रमांक, कायमस्वरुपी पत्ता,शैक्षणिक पात्रता,अनुभव प्रमाणपत्र इत्यादी माहितीसह १:२ या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे.खात्री पटविणेसाठी त्यांच्या शैक्षणिक पात्रता अर्हतेच्या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती तसेच स्वच्छक या पदावर यापूर्वी काम केले असल्यास कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र सादर करावे.(सत्यता पडताळणीसाठी मूळ प्रमाणपत्रे आणावे)उपलब्ध करून देण्यात आलेल्या मनुष्यबळाची पात्रता तपासून मनुष्यबळाच्या सेवा मुख्य कार्यकारी अधिकारी हे बाहययंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेतील.

Scanned with OKEN Scanner

१४. प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक यांचे कामकाजाबाबत कार्यालयाकडून तक्रारी प्राप्त होणार नाहीत.याबाबत संपूर्ण दक्षता मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या नोंदणीकृत बाहययंत्रणेने घ्यावी.कामकाजाबाबत तक्रार आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी बाहययंत्रणेची राहील.

१५. बाहयंत्रणेव्दारे सेवेकरिता पुरविण्यात आलेले प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक नेमून देण्यात आलेले काम व्यवस्थित करीत नसतील तर त्यांना त्यांचे मानधन अनुज्ञेय राहणार नाही.जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.गोंदिया याबाबत आवश्यक चौकशी करुन मानधन कपात करणे अथवा तदनुषांगिक निर्णय घेतील.

१६. निविदेतील अटी व शर्ती शिथिल करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

१७. अपुऱ्या शासकीय निधी अभावी किंवा तांत्रिक अडचणीमुळे मानधन देण्यास विलंब झाल्यास सदरील रकमेवरील व्याजाची मागणी करता येणार नाही.

१८. बाहयंत्रणेस निश्चित केलेले अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१९. शासनाचे उदगम कर कपात (TDS)धोरणानुसार मंजूर कंत्राटदाराचे देयकातील कर कपात नियमानुसार होऊन आयकर विभागाकडे परस्पर जमा होईल.

२०. उपरोक्त अटी व शर्तीखेरीज मुख्य कार्यकारी अधिकारी यांना परिस्थिती व आवश्यकतेनुसार इतर नवीन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा अधिकार राहील.

२१. सदरील जाहिर निविदेबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास तो सबंधित आरोग्य विभाग कार्यालयाच्या गोंदिया जिल्हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील.

२२. करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास संबंधित मनुष्यबळ पुरवठा करणारी नोंदणीकृत संस्था/कंपनी यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२३. संसथेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाची वेळ ही संबंधित कार्यालयीन कामाच्या वेळेनुसार असेल.कामाची निकड पाहून शासकीय सुटटीच्या दिवशी तसेच कार्यालयीन वेळेनंतरही सदर मनुष्यबळास उपस्थित राहणे बंधनकारक आहे व याकरिता स्वतंत्र मोबदला देण्यात येणार नाही.

२४. संबंधित मनुष्यबळाने कामाचे ठिकाणी गोपनीयता व तेथे लागू असणारे नियमाचे पालन करणे बंधनकारक आहे.

२५. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाहयंत्रणेने उपलब्ध करुन दिलेले मनुष्यबळ,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक हे संबंधित तालुका आरोग्य केंद्राचे तालुका नियंत्रण पथक ,प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांचे नियंत्रणाखली कार्यरत राहतील.सदरील मनुष्यबळास आदेश दिल्यापासून १० दिवसाचे आत संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्र येथे हजर राहावे लागेल.

२६. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाहयंत्रणेने पुरविलेले मनुष्यबळ हे त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या परिशिष्ट अ प्रमाणे पार पाडणे अनिवार्य आहे.याबाबतची सर्वस्वी जबाबदारी बाहयंत्रणेची राहील.

२७. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाहयंत्रणेने उपलब्ध करुन दिलेले मनुष्यबळ,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक यांची कोणत्याही प्रकारच्या चुकीमुळे किंवा हेतुपरस्पर केलेल्या आर्थिक अनियमिततेमुळे इत्यादीबाबत कोणत्याही प्रकारची प्रशासकीय अथवा आर्थिक अनियमितता झाल्यास संबंधित अनियमिततेची जबाबदारी संबंधित प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक यांची राहील.पर्यायाने अशा रकमेची वसुली बाहयंत्रणेकडून आणि संबंधित मनुष्यबळाकडून करण्यात येईल.

२८. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाहयंत्रणेने उपलब्ध करुन दिलेले मनुष्यबळ प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक यांचेबाबत तक्रार ,कामातील अनियमितता इत्यादीमुळे प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक यांची सेवा संपुष्टात येईल.पर्यायी मनुष्यबळ संस्थेने २ दिवसाचे आत आरोग्य विभाग कार्यालयास पुरविणे बंधनकारक राहील.मनुष्यबळाने स्व:हून राजीनामा

Scanned with OKEN Scanner

देणे,कामावर येण्यास नकार देणे अशा परिस्थितीत बाहयंत्रणेव्दारे २ दिवसाचे आंत पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

२९. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्याकीय अधिकारी हे बाहययंत्रणेमार्फत पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळास कामाबाबत मार्गदर्शन करतील.प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक हे वैद्यकीय अधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे दैनंदिन कामकाज करतील व वैद्यकीय अधिकारी यांना अहवाल सादर करतील.

३०. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाहययंत्रणेने पात्रतेप्रमाणे प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक हे मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावयाचे आहे.

३१. उमेदवारास मानधनी पद सोडावयाची इच्छा झाल्यास एक महिना अगोदर त्याविषयीची सूचना पुरवठाधारक तसेच वैद्यकीय अधिकारी यांना द्यावी लागेल व तसे न केल्यास एक महिण्याचा पगार जिल्हा परिषदेच्या स्वाधीन करावा लागेल.

३२. करारनाम्याचा कालावधी करारनामा केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाचा राहील.

३३. मंजूर निविदाधारक काम करण्यास असमर्थ ठरल्यास इतर कोणत्याही बाहययंत्रणा संस्थेकडून काम करुन घेण्यात येईल व ज्यादा खर्च झाल्यास तो मंजूर निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

३४. प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक कामावर असतांना त्यांना काही अपघात झाल्यास त्याची नुकसान भरपाई करणे ही संबंधित बाहययंत्रणेची जबाबदारी राहील.

३५. सदर नियुक्ती ही मानधनी असून तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने सदर पदावर नियमित करण्याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

३६. सदर नियुक्ती ही मानधनी स्वरुपाची असल्याने मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते लागू राहणार नाही.

**बाहयंत्रणेची निवड करतांना विचारात घ्यावयाचे गुणांकन**

| अ.क्र. | विवरण | गुण | विश्लेषण |
|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक या स्वरुपात मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव | ४० | मागील वर्षामध्ये सरासरी किती प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहन चालक इत्यादी मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले आहे.प्रतीवर्ष व प्रती संवर्गाला ०५ गुण याप्रमाणे गुण देण्यात येतील. |
| २ | मागील ३ वर्षाचा लेख परिक्षण ताळेबंद . | १५ | मागील ३ वर्षाच्या बाहययंत्रणेचे CA Audit Balance Sheet यांचे अहवाल पाहून त्यानुसार प्रतीवर्ष ०५ गुण देण्यात येतील. |
| ३ | शासकीय यंत्रणेसोबत काम करण्याचा अनुभव | १५ | शासकीय संस्थेला .प्रयोगशाळा तंत्रज्ञ,औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक इत्यादी मनुष्यबळ पुरवठा केल्याचा अनुभव असल्यास प्रतीवर्ष ०५ गुण प्रमाणे गुणदान देण्यात येतील. |
| ४ | स्थानिक बाहययंत्रणा | २० | बाहययंत्रणेचे कार्यालय हे संबंधित जिल्हयामध्ये असल्यास आणि त्याच जिल्हयासाठी .प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी,आरोग्य सहाय्यक व वाहनचालक आणणारे मनुष्यबळ पुरवठा करणार असल्यास २० गुण देण्यात येतील. |
| ५ | आर्थिक वार्षिक उलाढाल पात्रता | १० | बाहययंत्रणेच्या मागील ०३ वर्षाच्या वार्षिक उलाढालीनुसार प्रत्येक वर्षाला ०३ गुण देण्यात येतील.त्यावर आल्यास +१ गुण देण्यात येईल.किमान वार्षिक उलाढाल २५ लाख असावी. |
| | एकूण | १०० | |

Scanned with OKEN Scanner

## सुरक्षा अनामत (Security Deposit)/Performance Bank Guarantee Certificate

ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत केली जाईल,त्या निविदा धारकांनी रु............... (अक्षरी रु.........................................फक्त) इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,गोंदिया यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडीया गोंदिया येथील खाते क्र.३४०२७५७४७४५ मध्ये नेट बँकींगव्दारे भरणा केलेली ईसारा रक्कम सुरक्षा ठेवीमध्ये रुपांतरीत करण्यात येईल.(या रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही)

करारनामा मंजूर निविदाधारकास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसोबत रक्कम रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करारनामा करुन दयावा लागेल.करारनाम्यातील कोणत्याही अटीच्या अर्थाबाबत किंवा इतर कोणत्याही बाबतीत वादविवाद उदभवल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय बंधनकारक व अंतिम राहील.

| | |
|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>*Signed on E-Office* | स्वा/- |

| | |
|---|---|
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>*Signed on E-Office* | स्वा/- |

| | |
|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>*Signed on E-Office* | स्वा/- |

Scanned with OKEN Scanner

**प्राप्रति,**
**प्रारुप नमुना क्र.३**
**निविदा अर्ज**

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया

विषय :- या पदावर मनुष्यबळ पुरविण्याबाबतची निविदा.

दिनांक ................ आपले कार्यालयाच्या जाहिरातीनुसार आरोग्य विभाग जिल्हा परिषद,गोंदिया कार्यालयांतर्गत कुशल/ पदाच्या कामाकरिता मनुष्यबळ पुरविण्याबाबतची निविदा सादर करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा खरेदी फी रु.................. | | |
| | इसारा रक्कम रु.................... | | |
| २ | निविदाधारकाचे नाव व संपूर्ण पत्ता | | |
| ३ | संस्था/कंपनी/फर्म असल्यास त्याचा तपशील मनुष्यबळ पुरवठा करणारी नोंदणीकृत कंपनी/संस्था | | |
| | अ) नोंदणीचा तपशील | | |
| | ब) व्यवस्थापकाचे नाव व पत्ता | | |
| ४ | संपर्काचा तपशील | | |
| | अ) दूरध्वनी क्रमांक/मो.क्र. | | |
| | ब) फॅक्स क्रमांक/ई मेल आयडी | | |
| | क) संकेतस्थळ | | |
| ५ | आयकर,पॅन क्रमांक साक्षांकीत प्रत | | प्रत जोडलेली आहे/नाही |
| ६ | आयकर विवरणपत्राची मागील तीन आर्थिक वर्षाची प्रमाणित प्रत (२०२२-२०२३,२०२३-२४ व२०२४-२५) | | १)२०२२-२३ होय/नाही<br>२)२०२३-२४ होय/नाही<br>३)२०२४-२५ होय/नाही |
| ७ | सेवा कर नोंदणी क्रमांक | | प्रत जोडलेली आहे/नाही |
| ८ | सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ९ | २०२२-२०२३,२०२३-२४ व२०२४-२५या आर्थिक वर्षामध्ये सेवकर भरल्याचे विवरणपत्राचा तपशील | | |
| १० | कमर्चारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र (Employer & Employee Contribution) | | |
| ११ | ESIC कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Employer & Employee Contribution) | | |
| १२ | कामगार कल्याण निधी कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र | | |
| १३ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (Employer & Employee Contribution) | | |
| १४ | GSTIN नोंदणी प्रमाणपत्र | | |
| १५ | मं ुबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार | | प्रत जोडलेली आहे/नाही |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | नोंदणी प्रमाणपत्र (नुतनीकरणासह)क्रमं ाक,दिनांक | | |
| १६ | मागील ३ वर्षातील उलाढाल (Audit Reports) | | १)२०२२-२३ होय/नाही<br>२)२०२३-२४ होय/नाही<br>३)२०२४-२५ होय/नाही |
| १७ | अनुभव प्रमाणपत्र | | |
| १८ | उपलब्ध साधसामग्री व मनुष्यबळ | | |
| १९ | काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| २० | निविदा भरावयाच्या दिनांकास संसथेकडे शिल्लक रकमेचे Bank Balance Certificate | | |
| २१ | जाहिरातीत नमूद मानधनाची रक्कम मान्य आहे असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |
| २२ | निविदा अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र | | |
| २३ | निविदा दाखल करण्याबाबत देण्यात आलेले प्राधिकारपत्र | | |

ठिकाण :-
दिनांक :-

निविदाधारकाचे नाव :-
सही व शिक्का :-

बाहययंत्रणेने सादर करावयाचे प्रमाणपत्र (संस्थेच्या लेटर हेडवर)

मी/आम्ही खालील सही करणार.................................................. लिहून देतो/देते की,आरोग्य विभाग जि.प.गोंदिया अंतर्गत तालुका वैद्यकीय अधिकारी,जि.प.मुख्यालय,प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता .............. याप्रमाणे पदांकरिता मनुष्यबळ पुरविण्याबाबतची निविदा भरत असून नियमावलीतील वर नमूद संपूर्ण नियम व अटी मी/आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून मला/आम्हाला संपूर्णत: मान्य आहेत.त्याप्रमाणे या निविदा अर्जासोबत जी आवयक कागदपत्रे जोडण्यात आलेली आहेत त्यांची यादी सोबत जोडलेली आहे.उपरोक्त संपूर्ण नियम व अटी पुरवठा कालावधीत माझ्यावर/आमचेवर बंधनकारक राहतील याची मला/आम्हाला स्पष्ट कल्पना आहे.करिता खालील स्वाक्षरी करीत आहे/आहोत.

ठिकाण :-
दिनांक :-

निविदाधाराकाची स्वाक्षरी
नाव पूर्ण पत्ता व शिक्का

Scanned with OKEN Scanner